अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून राज्यातील विद्यमान संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत घट / अभ्यासक्रम बंद करण्यास व शासनाची मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. टीईएम-२०२०/प्र.क्र. ९८/तांशि-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २३ जुलै, २०२०.

<u>वाचा</u> : १) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मान्यता/ २०२०/४९३, दिनांक १०/०७/२०२०.
२) संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २/एनजीसी/मान्यता/ २०२०/५१५, दिनांक २०/०७/२०२०.

**प्रस्तावना :**

संचालक, तंत्रशिक्षण यांनी वर नमूद दिनांक १०/७/२०२० च्या पत्रान्वये विद्यमान अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, एचएमटीसीटी, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी, पदव्युत्तर पदवी संस्थेतील अभ्यासक्रम बंद करण्यास / प्रवेशक्षमतेत घट करण्यास शासन मान्यता देण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

संचालक, तंत्रशिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून सोबतच्या Annexure “A” मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विद्यमान प्रवेशक्षमतेमध्ये घट/अभ्यासक्रम बंद करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून संचालक, तंत्र शिक्षण यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे, शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून सोबतच्या Annexure “A” मधील संस्थांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे विद्यमान अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत घट /अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बंद करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

१) या संस्थेतील बंद करावयाच्या अभ्यासक्रमांच्या संबंधित सर्व दस्तऐवज जसे की गुणपत्रिका, उत्तरपत्रिका, निकालपत्रे, विद्यार्थ्यांचे पत्ते, फीच्या पावत्या इत्यादी बाबी संस्थेने संबंधित विद्यापीठाकडे सूपूर्द करणे आवश्यक राहील.

२) संबंधीत अभ्यासक्रमासाठी नियुक्त शिक्षक वर्ग/कर्मचारी यांच्या सेवाविषयक व इतर बाबतीत न्यायप्रविष्ठ असलेली सर्व प्रकरणांची जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील. भविष्यकाळात कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

३) संस्थेकडून शासनाची वसुली अद्यापी थकबाकी असल्यास त्याचा भरणा करणे संस्था प्रमुखांवर बंधनकारक राहील.

४) संस्थेमध्ये सदर अभ्यासक्रम राबविण्यासाठी आवश्यक स्थावर जंगम मालमत्तेविषयी या संस्थेने शासनाकडून किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतलेले असल्याचे यापुढे निदर्शनास आल्यास त्याची परतफेड करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

५) संस्थेतील संबंधित अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बंद करताना त्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना व माजी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची व परिक्षेस बसण्याची व्यवस्था करणे संस्थेवर बंधनकारक राहील. संस्थेने या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन न दिल्यास , संस्थेविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल व शासनाकडे ठेवलेली संचित ठेव शासन जमा करण्यात येईल.

६) संबंधित अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या संस्थेतील शिक्षक व कर्मचारी यांना नियमानुसार देय असलेले वेतन, वेतन भरपाई व अन्य आर्थिक प्रदानाचे भुगतान करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००७२३१५५९३०२६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( संजय औ. धारुरकर )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत).
३. सर्व अकृषि विद्यापीठांचे कुलसचिव (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
४. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
५. संबंधित संस्था (संचालक,तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), नवी दिल्ली.
८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.
९. निवड नस्ती/तांशि-४.

| Sr.No. | Institute Code | Institute Name | Institute_Address | District | Institution Type | Program | University | Level | Name of Course | Intake Approved for 2019-20 | Intake Approved for 2020-21 | Variation | Course Applied for |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 85 | 3209 | K.J. SOMAIYA INSTITUTE OF ENGINEERING & INFORMATION TECHNOLOGY | SOMAIYA AYURVIHAR COMPLEX, EVERARD NAGAR, EASTERN EXPRESS HIGHWAY,SION, | MUMBAI CITY | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University, Mumbai | UNDER GRADUATE | ELECTRONICS ENGINEERING | 60 | 0 | -60 | Closure of course |
| 86 | 3224 | G V ACHARYA INSTITUTE OF ENGINEERING AND TECHNOLOGY | VERACHARYA TECHNICAL EDUCATION CAMPUS, OPP. SHELU SUBURBAN RAILWAY STATION, SHELU/DAMAT, | RAIGAD | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University, Mumbai | UNDER GRADUATE | ELECTRONICS AND TELECOMMUNICATIONS ENGINEERING | 60 | 0 | -60 | Closure of course |
| 87 | 3350 | DURGADEVI SARAF INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES | 23-A, 24-28, S.V.ROAD, MALAD (W),MUMBAI | MUMBAI CITY | Private-Self Financing | MANAGEMENT | None | POST GRADUATE DIPLOMA | PGDM | 120 | 0 | -120 | Closure of course |
| 88 | 3351 | BHARAT COLLEGE OF ENGINEERING | KANHOR, BADLAPUR (WEST) | THANE | Private-Self Financing | ENGINEERING AND TECHNOLOGY | Mumbai University, Mumbai | UNDER GRADUATE | ELECTRONICS & TELE-COMMUNICATION ENGINEERING | 60 | 0 | -60 | Closure of course |
| 89 | 3354 | KOHINOOR BUSINESS SCHOOL | KOHINOOR CITY, EDUCATIONAL COMPLEX, KIROL ROAD, KURLA WEST | MUMBAI CITY | Private-Self Financing | MANAGEMENT | None | POST GRADUATE DIPLOMA | PGDM | 120 | 0 | -120 | Closure of course |